# पुण्यातील बुधवार पेठ वस्तीत पोलिसांनी घातलेल्या झाडी आणि नाकाबंदी याचा वेश्या व्यवसायातील व्यक्ती / ग्राहक आणि स्थानिक व्यावसायिक यांच्यावर झालेल्या परिणामांचाअभ्यास करणाऱ्या सत्यशोधन समितीच्या अहवालातील अंतरिम निरीक्षणे

१२ जून २०१९

## परिचय

जानेवारी २०१९ पासून सुरू झालेल्या या धडक कृती कार्यक्रमाचा आलेख एप्रिलच्या मध्यापर्यंत चढता होता. सदर घटनांतील गुंतागुंत, परिणाम, उद्देश आणि साध्य यांची सखोलता समजून घेण्यासाठी एक सत्यशोधन समिती गठित कऱण्यात आली होती. बुधवार पेठेतील वेश्यांच्या मानवी हक्कांसाठी गेली २० वर्षे पुण्यात कार्यरत असलेल्या सहेली संघ या संस्थेने या कामी पुढाकार घेतला होता. या कामी १९८७ पासून ग्रामीण महिलांसाठी पुण्यातील दोन जिल्हयात कार्यरत असणारी महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ ( मासूम) संस्था आणि १९७०च्या दशकात स्व. जयप्रकाश नारायण, न्या.व्ही.एम.तारकुंडे व इतर मान्यवरांनी स्थापन केलेली लोकस्वतंत्रता संघटना (People's Union for Civil Liberties - पीयुसीएल) यांचाही सहभाग होता. १९९७ पासून भारतातल्या ११ राज्यांत कार्यरत असलेल्या 'नॅशनल नेटवर्क फॉर सेक्स वर्कर्स' यांच्या सहाय्याने हे सत्यशोधनाचे काम हाती घेतले गेले.

सदर समितीने २० ते २२ मे २०१९ या काळात वस्तीत भेटी करून, वेश्याव्यवसायातील महिलांशी वैयक्तिक संवाद आणि गटचर्चा करून, पोलीस आणि इतर संबंधितांच्या मुलाखती घेऊन संशोधन केले आहे.

## पार्श्वभूमी

डिसेंबर २०१८ पासून पोलीसांनी पुण्यातील बुधवार पेठ येथे वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांकडून त्यांची ओळखपत्रे, त्यांच्या मूळ निवासस्थानाचा पत्ता, त्यांचे दाखले, फोटो मागण्यास सुरुवात केली. त्यांची एक यादी  पोलीसांनी बनवली. वेश्यांनी आपली कागदपत्रे पोलीसांना देण्याचे काम स्वेच्छेने करावे असे आवाहन यात नव्हते. उलटपक्षी ही कागदपत्रे जमा केली नाहीत तर त्यांना अटक होईल अथवा परिसर सोडून जावे लागेल अशी भीती घालण्यात आली होती.

बुधवार पेठेत धाडी पडणे हे तसे नवलाचे नसते पण २०१९ च्या जानेवारीतल्या पहिल्या आठवड्यापासून पोलिसांनी नाकाबंदी करण्यास सुरुवात केली. बुधवार पेठेकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर

अडथळे उभारून (बॅरिकेडस  लावून) रात्री दहा ते सकाळी पाच वाजेपर्यंत रस्ते बंद केले जायचे. कोणालाही वस्तीत आत जाण्यास किंवा आतून बाहेर येण्यास परवानगी नसायची. धंदा करणाऱ्या बायकांना मुंबई पोलीस कायद्याचे कलम 110 / 117  लावून अटक केली  जायची. शाब्दिक आणि शारीरिक हिंसा तर आम बाब झाली होती.

१६ जानेवारी रोजी एक मोठी शोध मोहीम पोलिसांनी पार पाडली. या मोहिमेत सर्व पुरुषांना, मग ते ग्राहक असोत, सहज भेटायला आलेले परिचित, त्या परिसरातून जाणारे कोणीही नागरिक असोत वा स्थानिक निवासी त्यांना, पकडून रस्त्यात बसवले. त्यांचे फोटो काढले, शूटिंग केले आणि त्याचे व्हिडिओ इंटरनेटवर वायरल केले. यामुळे भीती आणि दहशतीचे वातावरण पसरले ग्राहकांची जाहीर बदनामी, वेश्यासमुदायाला कवडीमोल मानून बेदखल करणे हे तर स्पष्टच दिसून येत होते. 'या परिसरात  पुन्हा दिसलात तर खबरदार' असे पोलीसांनी ग्राहकांना दरडावले. याचा परिणाम बायकांच्या उदरनिर्वाहावर झाला हे सांगणे न लगे.

अल्पवयीन मुलींची सुटका करणे, किंवा बांगलादेशी नागरिक महिलांना शोधणे या नावाखाली पोलीसांनी अनेकदा धाडी टाकल्या आणि प्रौढ भारतीय नागरिक असणाऱ्या महिलांनाही पकडून पुण्यातल्या  एका निवारागृहात भरती केले. तिथून सुटका हवी असेल तर कुटुंबातील कोणीतरी किंवा रक्ताचे नातलग तिथे यायला पाहिजेत अशी अट  होती. पण अनेक महिलांनी आपले व्यवसाय घरच्यापासून लपवलेले असल्यामुळे त्यांची पंचाईत  झाली आणि अनिच्छेनेच  कुंटूंबात हे उघड करावे लागले. ज्यांना  घरच्यांना कळवायचे नव्हते किंवा त्या कळवू शकल्या नाहीत  त्या अल्पवयीन नसल्या आणि बांगलादेशी नसल्या तरी  त्यांना निवारागृहातच राहणे भाग पडले.

काही अंतरिम निरिक्षणे

१)नाकाबंदी आणि धाड यांबद्दल पोलीसांचे म्हणणे आणि वेश्याव्यवसायातील स्त्रिया यांचे नुभव यात  विरोधाभास आढळला. पोलीसांच्या मते  धाडी आणि शोधमोहिमांचा उदेदश अल्पवयीन मुली आणि बांगलादेशी ( किंवा  एकाअर्थी कोणतेही परदेशी)  नागरिकांचा तपास लावणे हा होता. मात्र महिलांशी बोलताना कळले की धाडीत ज्यांना अटका करण्यात आल्या त्यातील कोणीही अल्पवयीन नव्हत्या की बांगलादेशी वा परकीय नागरिकही नव्हत्या. त्या सर्व २५ ते ३५ वर्षांच्या महिला होत्या. त्यांनी त्यांची कागदपत्रे जमा केली होती, त्यांना त्यांच्या मनाविरूद्ध तिथून सोडवण्यात (?) आले होते. महिलांनी असेही सांगितले की एक विशिष्ट तोतया ग्राहक निवारागृहाशी संबंधित आहे, पोलीसांना धाडीआधी काही खबरी पुरवत असतो पण त्याचे पेठेतल्या कुंटणखान्याशी संबंध

आहेत.पोलीसांचा दावा होता की रात्री चालणाऱ्या वेश्याव्यवसायाला आळा घालण्यासाठी धाडी किंवा नाकाबंदी करण्यात येत होती. पण रस्ते बंद करण्याचे काम बव्हंशः दिवसा झाले आहे.

२) अनेक महिलांनी सांगितले की धाडीच्या वेळी पोलीस शिवीगाळ करतात, शारीरिक हिंसा करतात. आणि निवारागृहाचे कर्मचारीदेखील पूर्वग्रहदूषित नजरेने पाहतात, अपमानकारक वागणूक देतात जणू गुन्हेगार असल्याचेच दर्शवतात.अनेकींनी तर असेही सांगितले की  आत घरात असतनाही 'तुम्ही ग्राहक खेचून घेताहात, असभ्य, अश्लील वर्तन करताहात' असे खोटे आणि मनमानी आरोप करून दंडही आकारला गेला आहे. महिलांच्या कथनातून पोलीसांच्या छळवणुकीच्या आणि गैरवर्तनाच्या अनेक घटना कळल्या.

३) बुधवार पेठेतल्या वेश्यांचे पुनर्वसन करणे हा या धाडी टाकण्यामागचा उद्देश नव्हता असे पोलीस म्हणत होते. पण हे निवारागृहाच्या कर्मचाऱ्यांना माहित नसावे कारण तात्पुरत्या निवारागृहात ठेवलेल्या वेश्यांची तेथून सुटका करताना त्यांच्याकडून 'पुन्हा वेश्याव्यवसाय करणार नाही' असे लिहून घेतले जात होते असे महिलांनी  सांगितले. सदरची माहिती देणाऱ्या ना अल्पवयीन होत्या ना जबरदस्तीने या व्यवसायात आणलेल्या ना परदेशी नागरिक.

४) वेश्या महिला आणि त्यांचे ग्राहकांची  नावे - चेहरे जाहीर करणे हे  खाजगीपणाचा हक्क आणि गोपनीयतेच्या हक्कच्या विरोधात आहे. ते सरळसरल कायद्याचे उल्लंगन आहे. पण  अशी बदनामी केली गेल्याचा परिणाम म्हणून या महिलांचे नियमित ग्राहक बुधवार पेठेत यायला घाबरून त्यांनाच बाहेर बोलावतात. बाहेर जायचे म्हणजे प्रवासखर्च आणि सुरक्षिततेचा धोका वाढतो.

५) या धडक कारवायांमुळे बायकांना व्यवसायातून मिळणारा पैसा कमी झाला आहे कारण मिळेल त्या रकमेत धंदा करून कशीतरी हातातोंडाची गाठ पडावी असा विचार त्या करतात. अनेकींनी आपली कमाई घसरल्याचे सांगितले. त्यांच्या मनाप्रमाणे पैसा मिळत नाही पण त्याबद्दल कुरकूरही करता येत नाही. याचा परिणाम म्हणजे घसरते उत्पन्न, उपासमार, थकित घरभाडे ,कर्जबाजारीपण, मुलांचे संगोपन करण्यात,घरी पैसे पाठवण्यात येणारी अडचण, मानसिक ताण आणि हतबलता.

६)पेठेतल्या पारंपारिक वेश्या, स्थानिक आणि उपऱ्या ( बाहेरच्या) यात फरक करण्यासाठी वापरले जाणारे आधार कार्ड, मूळ निवासस्थानाचा दाखला हे पुरावे केवळ गैरलागूच नाहीत तर  गैरसोयीचे आहेत. या समुदायावर भीतीचे सावट पसरले आहेच शिवाय व्यक्तीच्या खाजगीपणाच्या आणि गोपनीयतेच्या अधिकाराचे त्यात उल्लंघनही आहे.

७) धाड कोण टाकते, पुनर्वसन कोणाचे, कशासाठी याबाबत वेश्याव्यवसायातील महिलांच्या मनात संदिग्धता आहे. बुधवार पेठेतून मुलींची तथाकथित  सुटका करण्याच्या प्रक्रियेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व संशयाच्या घेऱ्यात आहे.

८) महिलांच्या कथनांतून लक्षात आले की धाडी टाकणे, गुन्हे दाखल कऱणे आणि प्रौढ वेश्यांना जबरदस्तीने निवारागृहात डांबणे हे सारे अनैतिक व्यापार प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा १९५६ चा (ITPA 1956) गैरवापर करून केले गेले. वेश्यांच्या अधिकारांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणावर झाले आहे हे दिसून येते. त्यामुळे त्यांची उपजीविका आणि जगणेच संकटात पडले आहे. ‘नवे वर्ष सुरू झाले आणि आजवरच्या आयुष्यात कधीही झाली नव्हती इतकी खराब परिस्थिती झाली’ असे अनेकींनी सांगितले.

सत्यशोधन समितीच्या अशा शिफारशी आहेत की नाकाबंदी आणि तपासणीनाके उभे करून पेठेतल्या रस्त्यांवर जे अडथळे उभे केले होते ते बंद व्हावे. तसेच ग्राहकांची छळवणूक, त्यांच्याशी गैरवर्तन, अपमान कऱणे हे ताबडतोब बंद कऱणे.मनमानी पद्धतीने पडलेल्या धाड टाकणे, नाकाबंदी यासारख्या कृती ताबडतोब बंद व्हायला हव्यात म्हणजे आपल्याला कधीही सक्तीने उचलून सुटका करतील अशा दडपणाखाली बायकांना जगावे लागू नये. अनैतिक व्यापार प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा १९५६ च्या (ITPA 1956) अंमलबजावणी दरम्यानगैरवापर केला जाणार नाही यासठी शासनाने दक्ष असायला हवे. स्वेच्छेने वेश्याव्यवसाय कऱणाऱ्या महिलांवर या कायद्याचा बडगा उगारला जाता कामा नये. या दृष्टिने पोलीस दलामध्ये वेश्याव्यवसायाबद्दल आणि वेश्यांच्या मानवी अधिकारांबद्दल जागरूकता आणि संवेदनशीलता निर्माण व्हावी याप्रकराचे प्रयत्न झाले पाहिजेत.

वेश्यांचे मानवी अधिकार, त्यांचा सन्मान आणि प्रतिष्ठा यांच्या जपणुकीबाबत कोणतीही तडजोड होता कामा नये.

सत्यशोधन समितीची ही अंतरिम निरिक्षणे आहेत तपशीलवार अहवाल लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

सत्यशोधन समिती करिता

सहेली संघ